# मुद्देमालाची निर्गती

**गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक**

# परीपत्रक

क्र.पोमसं/२३/५४/मुद्देमाल/२१३/२०२० मुंबई दि. २८/०१/२०२१

वेगवेगळया गुन्हयामध्ये पोलींसाकडुन किंमती मुद्देमाल जसे सोने-चांदी, जड-जवाहीर, इलेक्ट्रॉनिक्स वस्तु, वाहने इत्यादी जप्त केले जातात. असा मुद्देमाल मा. न्यायालयाचे आदेश घेवुन संबधीत फिर्यादीस परत करणे किंवा त्याची निर्गती / नाश करणे आवश्यक असते. परंतु ब-याच प्रकरणांमध्ये जप्त मुद्देमाल फिर्यादीस परत करतांना दिरंगाई होते, मुद्देमाल गहाळ होणे, चोरी होणे असे गैरप्रकार होतात. या मुळे वरील नमुद संदर्भांकीत परीपत्रकान्वये मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. कार्यालयाने मुद्देमालाच्या निर्गती संबधी सुचना केल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे आहेत.

# परीपत्रक

- पोलीसांना गुन्हयामधील / गुन्हयासंबधीच्या वस्तु फौ.प्र.सं. कलम १०२ प्रमाणे जप्त करण्याचे अधिकार आहेत.
- गुन्हयातील जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे पध्दती बाबत फौ. प्र.सं. कलम ४५१ ते ४५९ मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे.
- गुन्हयातील जप्त मुद्देमाल हा संबधीत गुन्हयांच्या निकालाच्या आदेशात दिल्याप्रमाणे विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. ज्या गुन्हयाची सुनावणी चालु आहे त्यात फौ.प्र.सं. कलम ४५७ अन्वयेच्या तरतुदी प्रमाणे विल्हेवाट लावली जाते.
- मुद्देमाल निर्गतीसाठी कायदेशिर कार्यपध्दती व न्यायालयीन आदेश यानुसार पुढील कार्यपध्दती अवलंबुन निर्गती केली पाहीजे.

# मुद्देमाल निर्गती संबधी आवश्यक बाबी

१) **मुद्देमाल स्विकार:-** जप्त मुद्देमाल दोषारोपसह न्यायालयात पाठविणे व तो न्यायालयात स्विकारणे आवश्यक आहे.

२) **कोर्ट निकाल व समरी हस्तगती नंरतची कार्यवाही:-** कोर्ट निकाल सम-या व अकस्मात मयतेच्या अंतिम समरी आलेनंतर त्याची क्राईम रजिस्टरी नोंद झाल्यानंतर त्या सम-या मुद्देमाल कारकुन यांचेकडे येणे आवश्यक असते. परंतु निकाल सम-या कारकुन यांना न मिळाल्याने जप्त मुद्देमालाबाबत काय आदेश झाला आहे याची माहिती होत नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा तसाच प्रलंबित राहतो. व यामुळेच ब-याच जुन्या नोंदीतील माल पोलीस ठाणेकडे प्रलंबित राहीलेला आहे. तरी क्राईम काम करणारे कर्मचा-याशी समन्वय ठेवुन अशा त्रुटी न राहणेची खबरदारी घ्यावी.

**३) गुन्हे समरी / गुन्हे निकाल प्राप्त करणे :-** जप्त असलेला मुद्देमाल ज्या गुन्हयातील आहे त्या गुन्हयाची निर्गती काय झालेली आहे? त्याची सध्यास्थिती काय आहे? निकाल लागला असल्यास मा. न्यायालयाने निकालपत्रात जप्त मालाबाबत काय निर्देश दिलेले आहेत? याबाबत माहिती प्राप्त करून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**४) मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशनांनुसार :-** सुंदरभाई अंबालाल देसाई विरूध्द गुजरात राज्य (ए.आय.आर.२००३ एस.सी. ६३८) या निकालात न्यायालयाने किमती मुद्देमाल, रोकड रक्कम तसेच वाहनांच्या मुद्देमाल निर्गतीच्या कार्यपध्दतीचे निर्देश दिले आहेत. ते पुढील प्रमाणे

# १) मौल्यवान / किंमती मुद्देमाल

- सोन्याचांदीचे दागिने असल्यास त्याचे वनज व कॅरेटबाबत अधिकृत तपासणीदार / सराफांकडुन तपासणी करून घेवुन त्याचे प्रमाणपत्रासह माल सुरक्षीत ठेवावा.
- गुन्हयातील जप्त मौल्यवान / किंमती मुद्देमालाबाबत संबधित न्यायालयाशी / गुन्हयातील फिर्यादीशी तपासी अंमलदाराचे मार्फतीने संपर्क साधुन आदेश प्राप्त करून घेवुन मुद्देमालाची निर्गती करावी.
- मौल्यवान / किंमती असा मुद्देमाल विनाकारण मुद्देमाल कक्षात ठेवणे योग्य नसुन. संबधीत न्यायालयाने फौ.द.प्र.सं. कलम ४५१ नुसार आदेश देणे आवश्यक आहे. असा मुद्देमाल जर घरफोडी, जबरी चोरी किंवा दरोडयातील असेल तर तो फिर्यादीस द्यावा. त्यासाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

  १) सविस्तर पंचनामा,

# १) मौल्यवान / किंमती मुद्देमाल

२) मुद्देमालाचे फोटो काढावेत,

३) मुद्देमाल ज्याच्या ताब्यात द्यावयाचा आहे अशा इसमांकडुन आवश्यक त्यावेळी कोर्ट सुनावणीच्यावेळी सादर करण्याची हमी देणारे बंधपत्र घ्यावी

४) न्यायालयाने पुराव्याकामी काढण्यात आलेल्या फोटोग्राफसची खात्री करावी. त्यात फिर्यादी, आरोपी तसेच ज्याच्या ताब्यात मुद्देमाल द्यावयाचा आहे, त्याची सही असणे आवश्यक आहे.

५) किंमती मुद्देमाल ताब्यात देणेस योग्य परिस्थीती नसेल तर अशा वेळी असा मुद्देमाल कोर्टाच्या आदेशान्वये पोलीस अधिकारी सविस्तर पंचनामा करून बँकेच्या लॉकर मध्ये ठेवु शकता. त्यासाठीची प्रक्रियाही मुद्देमाल जप्त केल्यानंतर जास्तीत जास्त एक आठवडयात करणे आवश्यक आहे.

# २) रोख रक्कम

१) मौल्यवान / किंमती मुद्देमालाचे निर्गतीसाठी दिलेल्या पध्दतीप्रमाणेच रोख रक्कमेची निर्गती करावी.

२) गुन्हयात जप्त केलेला व पंचनाम्यात नंबर लिहिलेल्या नोटांच्या बाबत रोख रकम या वर्षनिहाय गुन्हे क्रमांक टाकुन सुरक्षीत पॅकिंग करून जतन करून ठेवाव्यात अशा प्रकारच्या गुन्हयाचे दोषारोपपत्र दाखल झाले असल्यास सदरच्या रक्कम न्यायालयात जमा कराव्यात. त्यासंबधी मा. न्यायालयाशी पत्रव्यवहार करावा.

# ३) वाहनांची निर्गती

१)जप्त केलेल्या वाहनांबाबत संबधित न्यायालयाने तात्काळ ताबा देणेबाबत आदेश काढणे आवश्यक आहे

२) वाहनाचा सविस्तर पंचनामा करावा

३)वाहनांचे इंजिन व चेसिस नंबरचे फोटो काढुन गुन्हयाचे कागदपत्रांसोबत ठेवावे.

४) मुद्देमाल ज्याच्या ताब्यात द्यावयाचा आहे अशा इसमांकडुन त्यावेळी कोर्ट सुनावणीच्या वेळी वाहन सादर करण्याची हमी देणारे बंधपत्र तसेच काही रक्कम सुरक्षा ठेव म्हणुन घ्यावी

५) ज्या वाहनांचा मालकी अधिकार सांगण्यासाठी मालक, विमा कंपनी किंवा इतर त्रयस्थ व्यक्ती पुढे येत नाही. अशा वेळी संबधीत विमा कंपनीला वाहन ताब्यात घेणबाबत आदेशित करावे. जर विमा कंपनीने वाहन ताबा घेण्यास नकार दिला तर संबधीत न्यायालयाने सहा महिन्यात अशा वाहनांसदर्भात आदेश काढणे आवश्यक आहे. अशा वेळी सविस्तर पंचनामा, फोटो, बंधपत्र व सुरक्षा ठेव आदी कार्यपध्दती वापरावी.

## ३) वाहनांची निर्गती

८)वाहनांचे निर्गतीचे अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाव्यतीरिक्त गृहविभागाचे शासन परीपत्रक क्रमांक : न्यायपः-०८१८/प्र.क्र./१०५/ पोल-८ दिनांक ०९/१०/२०१८ ( संगणक सांकेतांक क्रमांक . २०१८१००९१७२२१९४६२९) अन्वये खालील सुचना दिल्या आहेत.

(७) रस्ते अपघातामध्ये क्षतीग्रस्त झालेले वाहनांचे घटनास्थळांवर कंवा घटनास्थळांजवळचे सर्व बाजुने फोटो काढुन व त्यांची सविस्तर माहिती, वर्णन करून सदर वाहन ते वाहन मालकांचे ताब्यात द्यावे. जर वाहनाची प्रादेशिक परीवहन अधिकारी व्दारे तपासणी करणे आवश्यक असेल. तरच पोलीस ठाण्यामध्ये आणावे व तशी नोंद पोलीस ठाणे दैनंदिनीला घेण्यात यावी. सदर वाहनाचे प्रादेशिक परीवहन अधिकारी कार्यालयाच्या मार्फतीने तात्काळ निरीक्षण करून वाहन मालकाच्या ताब्यात देण्याची कार्यवाीही करावी.

## ३) वाहनांची निर्गती

९) पोलीसांनी गुन्हयामध्ये जप्त केलेली वाहने फौ.प्र.सं. कलम ४५७ नुसार कोर्टाच्या आदेशान्वये संबधीत व्यक्तीला परत करता येतात. तसेच वाहनाची मालकी सिध्द होत नसल्यास फौ.प्र.सं. कलम ४५७ (२) अन्वये जाहीनामा काढुन घ्यावा. त्याची मुदत ६ महिन्यानंतर असते. त्या जाहीरनाम्याला व्यापक प्रसिध्द, वृत्तपत्रे व संकेतस्थहावर देण्यात यावी. ६ महिन्यानंतर कोणी व्यक्ती वाहनांवर हक्क सिध्द करु न शकल्यास संबधीत वाहनांचा लिलाव करून त्याची रक्कम शासन जमा करण्यात यावी.

१०) रस्त्यावर अनाधिकृतपणे सोडुन दिलेली वाहने / बेवारस वाहनांना हटविण्याबाबतीची कार्यपध्दती तसेच अशा वाहनांची तक्रार नोंदविण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणेबाबत महाराष्ट्र शासनाचे परीपत्रकामध्ये नमुद केलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करावे,

## ३) वाहनांची निर्गती

११) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ८२ अन्वये बेवारस मुद्देमाल / वाहन जप्त करण्याचे अधिकार पोलीसांना आहेत. अशा बेवारस मुद्देमालाबाबत म.पो.का.क. ८५ प्रमाणे जाहीरनामा काढावा. पोलीस अधिक्षक यांच्या मान्यतेने असा जाहीरनामा काढुन त्याला व्यापक प्रसिध्दी द्यावी. या जाहीरनाम्याचा कालावधी २ महिन्यांचा असतो. २ महिन्यांनंतर वाहनांवरील मालकी हक्क सिध्द न झाल्यास म.पो.का.क. ८७ अन्वये पोलीस अधिक्षक यांचया मान्यतेने लिलाव करून प्राप्त रक्कम शासन जमा करावी, बेवारस वाहनांची निर्गती करण्यापुर्वी सुरवातीला खालील कार्यपध्दती अवलंबावी त्यानंतर उपरोक्त कार्यवाही करावी.

## ३) वाहनांची निर्गती

**बेवारस वाहनांच्या निर्गती बाबतची कार्यवाही** :- १) बेवारस वाहनांसदर्भात मालकाचे नांव, पत्ता समजण्यासाठी वाहन क्रमांक, इंजिन तसेच चेसिस क्रमांकावरून वाहन कंपनी, प्रादेशिक परिवहन अधिकारी, विविध विमा कंपनी, पोलीस कार्यालये यांचेकडे पत्रव्यवहार कयन मालक शोधण्याचा प्रयत्न करावा.

२) मालक मिळुन आल्यास व त्याचे विमा रक्कम प्राप्त केली असल्यास संबधित विमा कंपनीशी पत्रव्यवहार करून वाहन त्यांना ताब्यात घेणेबाबत सुचित करावे. विमा कंपनीने वाहन घेण्यासा नकार दिल्यास त्या वाहनाचा लिलाव करून रक्कम सरकार जमा करावी.

३) वाहनांचे मालक निष्पन्न न झाल्यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ८५ व ८७ अन्वये कार्यवाही करून येणारी रक्कम सरकार जाम करावी.

## ४) बेवारस जप्त मुद्देमाल निर्गती

१) बेवारस स्थितीती सापडलेला मुद्देमाल महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ८२ प्रमाणे जप्त करण्याचे अधिकर आहेत

२) जो बेवारस मुद्देमाल जप्त केला आहे, त्याची विल्हेवाट महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ८४ व ८५ अन्वये करण्याची तरतुद आहे.

३) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ८५ प्रमाणे बेवारस मालमत्तेच्या मालकाचा शोध घेण्यासाठी सक्षम अधिका-यांमार्फत उदघोषणा काढुन त्यात मालमत्तेचे वर्णन तसेच उदघोषणा पत्राचा कालावधी निश्चित करतील

४) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ८३ प्रमाणे मालक हा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ८५ प्रमाणे केलेल्या उदघोषणेप्रमाणे मिळुन आल्यास आणि त्याने मालमत्तेचा मालकी हक्क सिध्द केल्यास मालमत्ता अशा मालकाच्या ताब्यात देणे

# ४) बेवारस जप्त मुद्देमाल निर्गती

५) महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ८७ प्रमाणे मालक हा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ८५ प्रमाणे केलेल्या उदघोषणेप्रमाणे मिळुन न आल्यास तो मालमत्ता सरकार जमा करून पोलीस अधीक्षकांचे आदेशाप्रमाणे लिलावाव्दारे विक्रीस काढली जाते.

६) बेवारस मालमत्ता उपरोक्त कार्यपध्दती अवलंबुन निर्गती करावी.

## ५) नशाबंदी मुद्देमाल निर्गतीची कार्यपध्दती

१) शासन परिपत्रक गृह मंत्रालय, क्र.म.शा./परीपत्रक/ईएसटी/२३६९/४९४६/पीआरओ-३ दि. ११/०८/१९८० चे अवलोकन करून त्यानुसार दारूबंदीच्या गुन्हयात १,०००/- रू पर्यंतचया जप्त मालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्याबाबत पोलीस उप अधीक्षकांना अधिकार देण्यात आले आहेत. सदरचे परीपत्रक प्राप्त करून त्यातील तरदुतीुनसार दारूबंदी गुन्हयातील जप्त मुद्देमालाची विल्हेवाट / निर्गती करावी.

२) सविस्तर पंचनामा करवा. आवश्यक ते नमुने घेवुन रासायनिक तज्ञांकडे पाठवुन द्यावे, मा. न्यायदंडाधिकारी यांचे आदेश घेवुन मोठया प्रमाणावरील जप्त दारूची आदेशाप्रमाणे विल्हेवाट लावावी.

## ६) जिवनावश्यक वस्तु कायद्याखाली जप्त मद्देमाल

१) पोलीस ठाण्यात जिवनाश्यक वस्तु कायद्याखाली गुन्हयात ज्वलनशील अथवा इतर वस्तु जप्त असल्यास त्याची निर्गती करण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय यांचेशी पत्रव्यवहार करून जप्त मालाची निर्गती करण्याबाबत आदेश प्राप्त करून घ्यावेत. तसेच गॅस सिलेंडर जप्त असल्यास सिलेंडरमधील गॅस ज्या कंपनीचा आहे त्या संबधीत कंपनीशी संपर्क साधुन न्यायालयाचे परवानगीने गॅस कंपनीकडे ठेवुन घेणेबाबत पत्रव्यवहार करावा.

## ७) विस्फोटक मद्देमालाची निर्गती

१) पोलीस ठाण्यात जप्त असलेले स्फोटके / ज्वलनशिल पदार्थ नाश करण्यासाठी न्यायालयाशी तसेच जिल्हादंडाधिकारी कार्यालयाशी पत्रव्यवहार करून आदेश प्राप्त करून निर्गती करावी. अशा स्फोटक / ज्वलनशिल मालाची वाहतुक करतांना / ज्वलनशिल पदार्थ वाहुन नेण्याचा परवाना असलेल्या वाहनांचाच वापर करूनु विस्फोटक निरीक्षक यांचे कडे पाठवुन त्यांचे मार्फतीने निर्गती करावी.

## ८) अकस्मात मृत्युमधील मद्देमालाची निर्गती

१) अकस्मात मृत्यु दाखल प्रकरणांमध्ये जप्त / ताब्यात घेण्यात आलेल्या मालासंबधी अखेर समरी अहवालातील उपविभाग दंडाधिकारी / विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेश / निर्देशाप्रमाणे कारवाई करावी.

२) अकस्मात मृत्यु प्रकरणात बऱ्याचवेळी समऱ्या मंजुर झालेल्या असतात, परंतु त्याची पोलीस ठाण्यात माहिती उपलब्ध नसते किंवा समऱ्या पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्यानंतर त्याच्या नोंदी ठेवल्या जात नाही. त्यामुळे अशा प्रकरणातील जप्त मुद्देमाल विनाकारण पोलीस ठाण्यात प्रलंबित राहतो. तरी त्याचा आढावा घेवुन किती समऱ्या प्राप्त झाल्या आहेत व त्यात जप्त मालासंबधीत काय निर्देश आहेत, याची खात्री करून त्याप्रमाणे तात्काळ निर्गती करावी.

## ८) जप्त आमली पदार्थ / मद्देमालाची निर्गती

१) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये दाखल गुन्हयातील जप्त करण्यात आलेला परंतु न्यायालयातुन निकाल झालेला व न्यायालयाने मंजुरी दिलेली जप्त अंमली पदार्थ नाश करण्यासाठी केंद्र शासनाच्या दि. १६/०१/२०१५ च्या अधिसुचनेनुसार तसेच भारत सरकार यांचेकडील स्थायी आदेश क्र. ०१/८९ दि. १३/०६/१९८९ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सुचनातील तरतुदीनुसार अंमली पर्दाज्ञ आपले जिल्हास्थरावर गठीत केलेल्या नाश समीतीमार्फत नाश करण्यात यावा. त्याबाबाबतचा अजवा संचालक नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो, भारत सरकार मिनिस्टी ऑफ फायनान्स, नवी दिल्ली यांना सादर करावा, त्याची प्रत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई तसेच अपर पोलीस महासंचाकल राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यायास पाठवावी

# प्रश्न व सुचना



# धन्यवाद ....